## प्रकरण ७ वे

## निष्कर्ष व शिफारशी.

७.१ प्रस्तावना.

७.२ निष्कर्ष.

क] प्रतिपादकांच्या सामान्य माहितीबाबतचे निष्कर्ष.

ख] बापूजींचे व्यक्तीगत जीवन व शिक्षण विषयक दृष्टिकोन या बाबतचे निष्कर्ष.

ग] बापूजींच्या शिक्षण प्रसार कार्याबाबतचे निष्कर्ष.

घ] बापूजींनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

च] बापूजींनी उच्चशिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

छ] बापूजींनी तंत्रशिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

ज] बापूजींनी शिक्षक प्रशिक्षणासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

झ] बापूजींच्या स्त्रीशिक्षण प्रसार कार्याबाबतचे निष्कर्ष.

ट] बापूजींनी वसतिगृहासंबंधी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

ठ] बापूजींनी सामाजिक एकता व जातीभेद निर्मूलनासंबंधी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

ड] विविध समाज घटकात बापूजी विषयीच्या भावना बाबतचे निष्कर्ष.

ढ] बापूजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाबाबतचे निष्कर्ष.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

७.३ शिफारशी -

क] शैक्षणिक दृष्टिकोना विषयी.

ख] माध्यमिक शिक्षण प्रसारा विषयी.

ग] उच्च शिक्षण प्रसारा विषयी.

घ] तंत्र शिक्षण प्रसारा विषयी.

च] शिक्षक प्रशिक्षणा विषयी.

छ] स्त्री शिक्षण प्रसारा विषयी.

ज] वसतिगृहा संबंधी.

झ] संस्था चालकाच्या सामाजिक कार्या

ट] शैक्षणिक तत्वज्ञाना विषयी.

ठ] बापूजींच्या स्मारका विषयी.

७.४ पुढील संशोधनासाठी विषय.

## ७.१ प्रस्तावना -

बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात बहुमोल असे कार्य केले आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्चशिक्षण, तंत्र शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, इत्यादी स्तरावर शिक्षणाची सोय करणे एवढयाच बाबी बापूजीनी केल्या नाहीत तर स्त्री शिक्षण, वसतिगृह चळवळीच्या माध्यमातून जातीभेद निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न केले व त्यातून सामाजिक एकता निर्माण होण्यास मदत झाली. समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

अभ्यासकाने "शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे" ह्या विषयाची संशोधनासाठी निवड केली होती. या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. त्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, विविध शाखांना भेटी, प्रकाशित साहित्य इत्यादी साधनाद्वारे माहिती मिळवली. मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन प्रकरण ४ मध्ये केले. या प्रकरणात निष्कर्ष शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय या बाबी दिल्या आहेत.

७.२ निष्कर्ष -

क] प्रतिसादकांच्या सामान्य माहिती बाबत चे निष्कर्ष -

१] बापूजींच्या जीवन कार्याविषयी ज्या व्यक्ती कडून प्रश्नावली भरून घेतल्या त्यामध्ये पदवीधर प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ८६ होते.

यावरून जास्तीत जास्त प्रतिसादक पदवीधर म्हणजे चांगल्या शैक्षणिक पात्रतेचे होते. त्यामुळे त्यांच्याकडून मिळालेली माहिती जास्त महत्वाची व विश्वसनीय असल्याचे दिसून आले.

२] बहुसंख्य प्रतिसादक संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांना बापूजींच्या शैक्षणिक कार्याविषयी जवळून माहिती होती.

३] प्रतिसादकामध्ये प्राध्यापकांची संख्या जास्त होती. त्यांनी बापूजींच्या कार्याचा अभ्यास केला होता. तसेच प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, संस्थेचे सदस्य, शिक्षकेतर कर्मचारी या संस्थेतील सेवकांच्या सर्व थरातून प्रतिसादकांनी बापूजींच्या कार्याविषयी दिलेली वेगवेगळी मते महत्वाची होती.

४] बहुसंख्य प्रतिसादक संस्थेचे कर्मचारी असल्याने त्यांचा बापूजीशी अनेकवेळा कोणत्या ना कोणत्या तरी कारणाने संबंध येत असे. त्यामुळे त्यांनी दिलेली माहिती अधिक विश्वसनीय होती.

ख] बापूजींचे व्यक्तिगत जीवन व शिक्षणविषयक दृष्टिकोन याबाबतचे निष्कर्ष.

१] बापूजींची राहाणी अत्यंत साधी होती व त्यांचा आहार साधा होता.

२] बापूजींचे जीवन सेवाभावी त्यागी व नि:स्वार्थी होतें.

३] बापूजींच्या जीवनावर स्वामी विवेकानंदाच्या तत्वज्ञानाचा सर्वात जास्त प्रभाव पडला होता.

४] बापूजींची काम करण्याची चिकाटी, संस्थेसाठी अहोरात्र कष्ट करण्याची तयारी, त्यागीवृत्ती, कठीण प्रसंगाला धैर्याने तोंड देण्याची वृत्ती इत्यादी गुण त्याच्यांत दिसून येतात.

५] बापूजीना सामाजिक कार्याची आवड होती. स्वदेशाभिमान स्वातंत्र्याविषयीची तळमळ आणि महात्मा गांधीजीकडून स्वातंत्र्य मिळविण्याविषयी मिळालेली प्रेरणा यामुळे ते स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले होते.

६] "सातारा जिल्हयाचा क्रांती इतिहास" लिहण्यामागे तत्कालीन क्रांतीकारकाना प्रेरणा मिळावी व समाजामध्ये स्वातंत्र्य मिळविण्याविषयी तीव्र भावना निर्माण व्हावी असा बापूजींचा उद्देश होता.

७] माध्यमिक विद्यार्थ्यांना चांगली पाठ्यपुस्तके मिळावीत या उद्देशाने बापुजीनी "साहित्य शोभा" या पाठ्यपुस्तक लेखनाचे काम केले.

८] बापूजीनी सार्वजनीक कामासाठी स्वत:च्या संसाराकडे दुर्लक्ष केले.

९] बापूजीना दीनदुबळ्या लोकाबद्दल आपुलकी होती.

१०] बापूजी स्वत:ची कामे स्वत: करीत.

११] बापूजीना कोणत्याही प्रकारचे व्यसन नव्हते.

१२] बापूजीनी प्रपंच करत करत शिक्षण प्रसार कार्यातून परमार्थ साधण्याचा प्रयत्न केला.

१३] बापूजी विज्ञानवादी, बुध्दीवादी, समाजवादी समाजसुधारक होते.

१४] बापूजीना स्वत:च्या कर्तव्याविषयी आत्मविश्वास व निष्ठा होती.

१५] शिक्षण संपादन केल्यामुळे आदर्श व सुसंस्कृत नागरीक होतील. शिक्षण हे केवळ पुस्तकी असू नये तर त्यातून स्वावलंबी होता यावे. असा बापूजींचा शिक्षणविषयक दृष्टिकोण होता.

ग] बापूजींच्या शिक्षण प्रसार कार्याबाबतचे निष्कर्ष.

१] बापूजीना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून शिक्षण प्रसार कार्याविषयी प्रेरणा मिळाली.

२] शिक्षणाशिवाय समाजाची सुधारणा होणार नाही हे बापूजीनी पक्के ओळखले होते.

३] बापूजीनी विद्यार्थी दशेतच इस्लामपूर येथे "श्री राम समाज सेवा मंडळ स्थापन केले व या मंडळातर्फे प्राथमिक शाळा चालविल्या.

४] कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या "रयत शिक्षण संस्थेत" दहा वर्षे निष्ठेने शिक्षकाची नोकरी केली.

५] बापूजीनी शिक्षण प्रसारासाठी सन १९५४ मध्ये "श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.

६] बापूजीनी शिक्षण प्रसार कार्यासाठी "ज्ञान, विज्ञान, सुसंस्कार या साठी शिक्षण प्रसार" या ध्येय वाक्याचा स्विकार केला.

७] बापूजीनी मुलामुलींच्या शिक्षणाच्या गैरसोयी लक्षात घेवून त्यांच्यासाठी वसतिगृहे बांधली.

८] शिक्षण हीच खरी संपत्ती आहे असे बापूजीचे मत होते.

घ] बापूजीनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

१] बापूजीनी खेडयापाडयातील सामान्य जनतेला माध्यमिक शिक्षणाबाबतचे महत्त्व पटवून दिले.

२] बापूजीना माध्यमिक शाळेच्या मान्यतेसाठी शासनाशी झगडावे लागले.

३] माध्यमिक विद्यालये सुरु करताना त्यांनी ग्रामस्थांच्या वेळी अवेळी बैठका घेतल्या, ग्रामीण भागाशी संपर्क वाढविला व ग्रामस्थाचे सहकार्य मिळविले.

४] माध्यमिक विद्यालये सुरु करण्यासाठी ठिकठिकाणी हिंडून त्यांना लोकवर्गणी जमा करावी लागली.

५] माध्यमिक विद्यालयांच्या इमारतीचा प्रश्न सोडविण्यासाठी बापूजींनी मनोरंजनात्मक कार्यक्रम, देणग्या इत्यादी मार्गाने इमारत निधी जमा केला.

६] माध्यमिक विद्यालयांचा विकास व्हावा म्हणून बापूजींनी क्रिडांगण, ग्रंथालय, खेळाचे साहित्य, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी सुविधा पुरविण्याकडे अधिक लक्ष दिले.

७] माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये आदर्श निर्मिती व्हावी म्हणून विद्यालयाना थोर पुरुषांची व संतांची नांवे दिली.

८] माध्यमिक विद्यालयांचे प्रशासनच्या सोयी साठी पश्चिम महाराष्ट्र कोकण, मराठवाडा असे विभाग केले व त्यावर योग्य लोकांची व्यवस्थापक समिती नेमली.

९] गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गैरसोयी दूर करण्यासाठी ठिक-ठिकाणी वसतिगृहे काढली.

१०] माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आदर्श, कार्यक्षम, अनुभवी शिक्षकांच्या नेमणूका केल्या.

११] बापूजींनी उच्च माध्यमिक शिक्षणास उत्तेजन मिळावे म्हणून ११ वी १२ वी चे वर्ग स्वतंत्रपणे सुरु केले.

१२] गरीब होतकरु विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या योजना जाहीर करुन त्यांनी उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले.

१४] उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या.

१५] उच्च माध्यमिक विद्यालयासाठी अनुभवी, कार्यक्षम व योग्य शैक्षणिक पात्रता धारक शिक्षक नेमले.

१६] बापूजींनी कोल्हापूर-२७, सातारा-५५, सांगली-१८, पुणे-१४, सोलापूर-६, रत्नागिरी-२०, उस्मानाबाद-३, बीड-२ इत्यादी जिल्ह्यात एकंदर १४५ माध्यमिक विद्यालये काढली.

च] बापूजीनी उच्च शिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याबाबत चे निष्कर्ष -

१] उच्च शिक्षणाचे महत्व व वाढती गरज पटवून देण्यासाठी बापूजीनी ठिकठिकाणी दौरे काढले.

२] महाविद्यालये काढण्यासाठी स्थानिक लोकांचे जनमत तयार करून त्यांच सहकार्य मिळविले.

३] महाविद्यालय मान्यतेसाठी विद्यापीठातील मान्यवर व्यक्तींच्या वारंवार भेटी घेतल्या, प्रसंगी उपोषणे केली.

४] महाविद्यालयांच्या इमारतीचा प्रश्न सोडविण्यासाठी बापूजीनी मनोरंजनात्मक कार्यक्रम , देणग्या इत्यादी मार्गाने इमारत निधी जमा केला.

५] महाविद्यालयांचा विकास व्हावा आणि महाविद्यालयीन शिक्षणाला उत्तेजन मिळावे म्हणून बापूजीनी क्रीडांगण, ग्रंथालय, खेळाचे साहित्य, फर्निचर , पिण्याच्या पाण्याची सोय, इत्यादी सुविधा पुरविण्याकडे अधिक लक्ष्य दिले.

६] महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आदर्श निर्मिती व्हावी म्हणून महाविद्यालयाना थोर पुरूषांची नांवे दिली.

७] महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून बापूजीनी मेहनती आदर्श व योग्य पात्रता धारक प्राध्यापकांच्या नेमणूका केल्या.

८] महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे म्हणून ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी, वसतिगृहे चालविली.

९] गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी , "कमवा व शिका," पुस्तक पेढी" शिष्यवृत्या , बक्षीस योजना, इत्यादी योजना राबवून उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले.

१०] बापूजीनी कोल्हापूर जिल्ह्यात -४ , सांगली जिल्ह्यात-४, सातारा जिल्ह्यात-३, उस्मानाबाद जिल्ह्यात-३, पुणे जिल्ह्यात-१ व रायगड जिल्ह्यात-१ अशी एकंदर १६ महाविद्यालये काढली.

छ] बापूजीनी तंत्रशिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष -

१] तंत्र शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून दिले.

२] तंत्र शिक्षणाच्या प्रसारासाठी बापूजीनी एकंदर ५ तंत्र विद्यालये, व एक तंत्र निकेतन काढले.

३] तंत्र विद्यालयात प्रशिक्षित शिक्षकांच्या नेमणूका करून त्यांच्याकडून विद्यार्थ्यांमध्ये तंत्र शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.

४] तंत्र शिक्षणाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी स्वतंत्र तंत्र प्रयोगशाळा सुरु केल्या.

५] विद्यार्थ्यांची तंत्र कौशल्ये विकसीत होण्यासाठी अत्याधुनिक साहित्याचा पुरवठा केला.

ज] बापूजीनी शिक्षक प्रशिक्षणासाठी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष -

१] बापूजीनी प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी उस्मानाबाद जिल्हयात३, बीड जिल्हयात १, कोल्हापूर जिल्हयात १, सातारा जिल्हयात २, सांगली जिल्हयात १, अशी एकंदर ८ अध्यापक विद्यालये काढली.

२] बापूजीनी माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी उस्मानाबाद कराड, तासगांव येथे अध्यापक महाविद्यालये काढली.

३] शिक्षकांचा अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना सेवान्तर्गत प्रशिक्षणाची संधी दिली.

४] शिक्षकाना वेतनश्रेणी मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न केले.

५] शिक्षकांच्या निरनिराळ्या प्रश्नांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला.

६] शिक्षकामध्ये विचारांची देवाणघेवाण व्हावी म्हणून संस्कार शिबीरे घेतली.

७] शिक्षकांना माफक दराने कर्ज मिळावे म्हणून पतसंस्था स्थापन केल्या.

झ. ] बापूजींच्या स्त्री शिक्षण प्रसार कार्याबाबतचे निष्कर्ष -

१] स्त्री हा समाज सुधारणेचा मुलाधार आहे अशी बापूजींची धारणा होती.

२] मुलींच्या शिक्षणास गती मिळावी म्हणून मुलीसाठी स्वतंत्र माध्यमिक विद्यालये काढली.

३] महाराष्ट्रातील बहुजन समाजाला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

४] मुलींच्या राहाण्या जेवण्याची गैरसोय दूर करण्यासाठी स्वतंत्र वसतिगृहे काढली.

५] मुलींच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून कराड येथे कमला नेहरु अध्यापक विद्यालय सुरु केले.

६] तासगांव येथे पदवीधर मुलींच्या प्रशिक्षण सोयीसाठी अध्यापक महाविद्यालय सुरु केले.

७] स्त्रीयांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी स्त्रीयांना आपल्या संस्थेत निरनिराळ्या हुद्यावर काम करण्याची संधी दिली.

८] स्त्रीयांनी पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रात काम करावे म्हणून स्त्रीयांना निरनिराळी क्षेत्रे उपलब्ध करुन दिली.

९] मुलींच्या शिक्षणास अधिक गती मिळावी म्हणून मुलीना फी सवलती बक्षीस योजना शिष्यवृत्या इत्यादी उपाय अवलंबिले.

१०] संस्थेच्या शाखामधून प्रौढ स्त्री साक्षरता वर्ग चालविले.

ट] बापूजीनी वसतिगृहासंबंधी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

१] मुलांची राहाण्याजेवण्याची सोय व्हावी म्हणून एकंदर 23 वसतिगृहे काढली.

२] बापूजीनी एकाच वसतिगृहात सर्व जातीधर्मांच्या मुलाना प्रवेश दिला.

३] वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये श्रम प्रतिष्ठा निर्माण केली.

४] बापूजींनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःची कामे स्वतः करावयास लावली. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे मिळाले.

५] वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांनी शिस्त, नियमितपणा, व्यायाम, इत्यादी चांगल्या सवयी लावल्या.

६] बापूजींनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून पुढीलप्रमाणे निरनिराळ्या योजना आखल्या होत्या.

वसतिगृहातील मुलामध्ये सभाधीटपणा येण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, त्यांच्यामध्ये नेतृत्व गुणांचो वाढ व्हावी म्हणून मुलांचे मंत्रिमंडळ नेमणे, त्यांच्या कला गुणाना वाव मिळण्यासाठी मनोरंजनात्मक कार्यक्रम आखले.

७] वसतिगृहातील मुलांचा आहार साधा पण पौष्टिक असावा या बाबीकडे बापूजींनी लक्ष्य दिले.

८] बापूजी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची तयारी करवून घेत.

९] बापूजींनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहारिक जीवनाचे शिक्षण दिले.

१०] वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये त्यांनी सहजीवनामधून सामाजिक एकतेची भावना रुजविली.

## ठ] बापूजींनी सामाजिक एकता व जातीभेद निर्मूलना संबंधी केलेल्या कार्याबाबतचे निष्कर्ष.

१] एकाच वसतिगृहात निरनिराळ्या जातीच्या मुलाना प्रवेश देवून सामाजिक एकता साधण्यासाठी बापूजींनी प्रयत्न केले.

२] संस्थेच्या सेवेत कर्मचारी भरती करतानाजातीभेद न मानता सर्व जातीच्या उमेदवारांना संधी दिली.

३] बापूजी निरनिराळ्या जातीच्या मुलाबद्दल आपलेपणा दाखवित. त्याचे उदा. म्हणजे आबासाहेब कांबळे या हरिजन विद्यार्थ्यास त्यानी स्वतः:च्या घरी ठेवून एम्. बी. बी. एस्. पर्यंतचे शिक्षण घेण्यास सहकार्य केले.

४] जातीभेद नष्ट होण्यासाठी संस्कार शिबीरे भरविली.

५] संत गाडगेबाबांच्या बरोबर बापूजी जातीभेद निर्मूलन मोहिमेत फिरले.

६] बापूजीनी संस्थेचे व्यवस्थापक मंडळ तयार करताना निरनिराळ्या जातीच्या लोकांना सभासदत्व दिले.

७] अस्पृश्य वस्तीमध्ये जावून सार्वजनिक स्वच्छेतसाठी प्रयत्न केले.

८] ब्राम्हणानीच सत्यनारायण पुजा करावी ही पारंपारिक प्रथा बंद करण्यासाठी बापूजीनी घरोघरी जावून सत्यनारायण पुजा व इतर धार्मिक विधी विनामुल्य केल्यामुळे सामाजिक परिवर्तन घडण्यास मदत झाली.

९] संस्थेने चालविलेल्या विविध शाखामधून हरिजन स्वच्छता सप्ताह व प्रभात फे-या या सारख्या कार्यक्रमांना उत्तेजन देवून जातीभेद निर्मूलनासाठी प्रयत्न केले.

१०] बापूजीनी वसतिगृहे चळवळीच्या माध्यमातून सामाजिक एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

ड] <u>विविध समाज घटकात बापूजी विषयीच्या भावनाबाबतचे निष्कर्ष-</u>

१] सर्वसामान्य जनता बापुजीना उध्दारकर्ते मानीत होती.

२] सुशिक्षीत समाजातील लोक बापूजीना शिक्षण प्रसारक मानीत होते.

३] सरकारी दरबारात बापूजी एक समाजसुधारक होते अशी भावना होती.

४] विद्यापीठ वर्तुळातील लोक बापूजीना एकशिक्षण तज्ञ मानीत होते.

## ८] बापूजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाबाबतचे निष्कर्ष -

१] बापूजींच्या शैक्षणिक कार्याची बैठक सत्य, शील प्रामाणिकपणा, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, त्याग आणि सेवा, या पंचशील तत्वाला आधारित होती.

२] संस्कार संपन्न समाज निर्मितीसाठी आदर्श त्याग व सेवाभावी वृत्तीची गरज त्यांनी प्रतिपादन केली.

३] बापूजींनी विद्यार्थी व शिक्षकाविषयी आचार, विचार, शील व ज्ञान यांचे संवर्धन करावे असा दृष्टिकोण मांडला.

४] चांगले किंवा वाईट जाणण्याची पात्रता, तसेच माणसाचा सर्वांगीण विकास शिक्षणानेच होईल यावर त्यांचा विश्वास होता.

५] "ज्ञान विज्ञान सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" हे शैक्षणिक तत्वज्ञान संस्थेच्या ध्येय वाक्यातून बापूजींनी मांडले.

६] शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी श्रमसंस्कार या तत्वाचा त्यांनी स्विकार केला.

७] स्व अनुभवास बापूजी फार महत्व देत. प्राप्त स्थितीत आपण मार्ग शोधला पाहिजे या तत्वाचा त्यानी अंगिकार केला.

८] बापूजींचे शैक्षणिक तत्वज्ञान केवळ पुस्तकी स्वरुपाचे नव्हते. प्रतिपादन केलेल्या तत्वांचा त्यांनी प्रत्यक्ष व्यवहाराशी संबंध जोडलेला दिसून येतो.

मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन करुन त्यावर आधारित निष्कर्ष याच प्रकरणातील मागील कांही पानावर दिले आहेत. संशोधक आता निष्कर्षांच्या आधारे कांही शिफारशी पुढील-प्रमाणे देत आहे.

७.३ शिफारशी -

क] शैक्षणिक दृष्टिकोना विषयी -

१] शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, अरोग्य, त्याग, चारित्र्य संवर्धन व सुसंस्काराचे महत्त्व पटवून देण्यासाठी बापूजींनी चालविलेल्या शाळा महाविद्यालयातून बापूजींचे टिकात्मक पाठ, त्यांचे जीवन चरित्र व कार्याबद्दलच्या माहितीचा अभ्यासक्रमातून समावेश करावा.

२] रोटरी क्लब, लॉयन्स क्लब अशा सेवा भावी संस्थानी विद्यार्थ्यांच्या अरोग्य रक्षणासाठी प्रयत्न करावेत.

३] प्रत्येक संस्थेने शिक्षणातून समाज जागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावेत.

४] प्रत्येक शिक्षण संस्थानी विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख बनविणारे शिक्षण द्यावे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार निर्माण करावेत.

५] शिक्षण प्रसारासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे येवून शिक्षण संस्थांना देणग्या द्याव्यात.

ख] माध्यमिक शिक्षण प्रसारा विषयी -

१] बापूजींच्या माध्यमिक शिक्षण प्रसार कार्याला गती देण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद संस्थेने आणखी नवीन माध्यमिक विद्यालये काढावीत.

२] माध्यमिक शिक्षण स्तरावर व्यावसायिक अभ्यासक्रमावर अधिक भर द्यावा.

३] माध्यमिक शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शासनाने एक राज्य व्यापी शाळा सुधार कार्यक्रम अमलात आणावा.

४] विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या जाहीर कराव्यात, ग्रंथालये उघडावीत व इतर सोयी कराव्यात.

५] "शालासमूह" योजनेचे पथदर्शक प्रकल्प चालू करावेत.

ग] <u>उच्च शिक्षण प्रसारा विषयी -</u>

१] बापूजींच्या उच्च शिक्षण प्रसार कार्याला गती देण्यासाठी स्वामी विवेकानंद संस्थेने आणखी नवीन महाविद्यालये काढावीत.

२] प्रत्येक महाविद्यालयाने " कमवा व शिका" ही योजना राबवावी.

३] प्रत्येक सेवाभावी संस्थेने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व आदर्श निर्माण होण्यासाठी प्रयत्न करावेत.

४] शैक्षणिक विचार मंथन आणि संशोधन यांना उत्तेजन देण्यासाठी एक राष्ट्रीय शैक्षणिक अकादमी स्थापन करावी.

५] कांही महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा देऊन अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती याबाबतीत स्वातंत्र्य द्यावे.

घ] <u>तंत्र शिक्षण प्रसारा विषयी -</u>

१] बापूजींच्या तंत्रशिक्षण प्रसार कार्याला गती देण्यासाठी स्वामी विवेकानंद संस्थेने आणखी नविन तंत्र विद्यालये काढवीत.

२] सद्या चालू असलेल्या तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयांना शासनाने अनुदान द्यावे.

३] चिरनिराळ्या उद्योग धंद्याच्या तंत्र शिक्षणामध्ये प्रात्यक्षिक कार्यावर अधिक भर द्यावा.

४] तंत्र शिक्षण अभ्यासक्रमात व्यावसायातील प्रत्यक्ष अनुभव प्रायोगिक कार्य आणि धंद्यातील वेगवेगळे प्रश्न सोडविणारे पाठ्यक्रम असावेत.

५] तंत्र शिक्षण प्रसाराला गती मिळण्यासाठी सेवाभावी संस्थानी पुढे येऊन आर्थिक सहकार्य करावे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या जाहीर कराव्यात.

च] <u>शिक्षक प्रशिक्षणाविषयी -</u>

१] शिक्षणाचा गुणात्मक विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षक प्रशिक्षण ही निकडीची बाब असल्याने शैक्षणिक नियोजनात त्यास योग्य स्थान देऊन केंद्र व राज्य पातळीवर त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करावी.

२] प्रत्येक राज्यात समावेशक प्रशिक्षण महाविद्यालये स्थापन करावी.

३] शिक्षकासाठी पत्रद्वारे अभ्यासक्रम व सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय असावी.

४] शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी राज्य पातळीवर संस्कार शिबीरे घेतली जावीत.

५] शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशिक्षणाचा कालावधी वाढवावा.

छ] <u>स्त्री शिक्षण प्रसाराविषयी -</u>

१] मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी मुलीसाठी प्रत्येक संस्थेने वसतिगृहे काढावीत.

२] बापूजींनी चालविलेल्या मुलींच्या शाळा व महाविद्यालयांच्या विकासाकडे श्री स्वामी विवेकानंद संस्थेने अधिक लक्ष द्यावे.

३] मुलींच्या शिक्षणाबाबतच्या पालकांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी सेवाभावी संस्थानी प्रयत्न करावेत.

४] माध्यमिक स्तरावर मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढणे, वसतिगृहे काढणे, मुलींसाठी शिष्यवृत्या देणे इत्यादी गोष्टीवर भर द्यावा.

५] सेवाभावी संस्थानी प्रौढ स्त्रीयांसाठी साक्षरता वर्ग चालवावेत.

ज] वसतिगृहासंबंधीच्या शिफारशी -

१] प्रत्येक सेवाभावी संस्थेने बापूजींनी चालविलेल्या वसतिगृह पध्दतीचे अनुकरण करावे.

२] प्रत्येक वसतिगृहात व्यायाम प्रकाराच्या सुविधा क्रिडांगण असावे.

३] वसतिगृहातील मुलांना दररोज १ तास शारीरिक श्रम करण्याची सवय लावावी.

झ] संस्था चालकाच्या सामाजिक कार्यासंबंधी -

१] प्रत्येक सेवाभावी संस्थेने आपल्या वागणूकीने विद्यार्थी व समाजासमोर आदर्श ठेवावा.

२] प्रत्येक शिक्षण संस्था पालकांनी जातीभेद निर्मूलनासंबंधी अधिक प्रयत्न करून सामाजिक एकता साधावी.

३] प्रत्येक सेवाभावी संस्थानी आंतर जातीय विवाह घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावेत.

ट] शैक्षणिक तत्वज्ञाना विषयी -

१] बापूजींच्या तत्वांचा, आचरणाचा प्रसार होण्यासाठी बापूजींच्या स्मरणार्थ प्रत्येक शाखेतून बापूजींची तत्वे व कार्य यावर वक्तृत्व स्पर्धा घ्याव्यात.

२] संस्था चालकांनी विद्यार्थी व समाजासमोर बापूजींच्या आचरणाचा व तत्वज्ञानाचा आदर्श ठेवण्याचा प्रयत्न करावा.

३] प्रत्येक सेवाभावी संस्थांनी आदर्श, त्याग, सत्य, शील, या तत्वांचा अंगिकार करण्याचा प्रयत्न करावा.

ठ] बापूजींच्या स्मारका विषयी -

१] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे जीवन सद्याच्या काळात दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार आहे. त्यासाठी बापूजींचे चिरंतन स्मारक व्हावे म्हणून त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा.

७.४ पुढील संशोधनासाठी विषय -

संशोधनाचा हा विषय व्यापक असल्याने संशोधकाला संशोधनाच्या व्याप्तीमध्ये कांही मर्यादा पाळाव्या लागल्या. बापूजी साळुंखे यांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत. परंतु संशोधकाने त्यांच्या शैक्षणिक कार्यापुरतेच लक्ष्य केंद्रित केल्यामुळे त्यांच्या कार्याच्या इतर बाबीकडे लक्ष्य देता आले नाही. अशा कांही विषयावर संशोधन करता येईल. असे संशोधकास वाटते. असे कांही विषय खाली दिले आहेत.

१] " ग्रामीण शिक्षण चळवळीतील शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या सहभागाचा चिकित्सक अभ्यास. "

२] " शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे व इतर शिक्षण संस्थापक यांचा तुलनात्मक अभ्यास. "

३] " शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी सुरु केलेल्या वसतिगृहाचा चिकित्सक अभ्यास. "

४] "शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास. "

५] " शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे समाजशिक्षणातील योगदान. "

=:=:=:=:=: